# इचलकरंजी महानगरपालिका,इचलकरंजी.

(जि. कोल्हापूर )

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

कार्यालय :- भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी चौक, स्टेशन रोड, इचलकरंजी - ४१६११५.

महानगरपालिका कार्यालय,
फोन नं. . - २४२१४५१ ते २४२१४५५

EMAIL: ichalkaranjinp@gmail.com
EMAIL: imc22.tp@gmail.com


व शि.

जा.क्र./इमपा/नरवि/१४२४/प्र.क्र. ३२ /३६४ /२४ दि. २६/ ११ /२०२४

प्रति,
संगणक अभियंता,
इचलकरंजी महानगरपालिका.

**विषय :- भूसंपादन- इचलकरंजी -एलएक्यू/स्पे/४८४**
विकास योजना इचलकरंजी आ.क्र. IV/ २९ - गार्डन यासाठी शहापूर सि.स.नं. १९४२८ पै. (गट नं. ३८५ पै.), सि.स.नं. १९५२२ पै. (गट नं. ३८९ पै.) व सि.स.नं. १९२५६ पै. (गट नं. ३८७ पै.),अंदाजित २०६७.६० चौ.मी. क्षेत्राचे भूसंपादन करणे प्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ (४) सह भूमि संपादन, पुनर्वसन व पुर्नस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ अन्वयेची अधिसूचना व कलम २१ (१) व (२) अन्वयेची प्रकटपत्र प्रसिध्द करणेबाबत.

**संदर्भ :-** १) दि. २८/१०/२०२४ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग - एक- असाधारण-पुणे विभागीय पुरवणी मध्ये पृष्ठ क्र. ३,४ व ५ वर प्रसिध्द झालेली कलम १९ ची अधिसूचना.
२) भूमि संपादन विशेष अधिकारी (११) कोल्हापूर यांचे जा.क्र. /एलएक्यू/स्पे/४८४/ इचलकरंजी/भुसंविअ- (११) को /४८४ दि. ०६/११/२०२४ रोजीचे पत्र.

विषयांकीत प्रकरणी इचलकरंजी शहर विकास योजना आरक्षण क्र. **IV/२९** - गार्डन या आरक्षणाने बाधित होणा-या मौजे शहापूर सि.स.नं. १९४२८ पै. (गट नं. ३८५ पै.), सि.स.नं. १९५२२ पै. (गट नं. ३८९ पै.) व सि.स.नं. १९२५६ पै. (गट नं. ३८७ पै.),अंदाजित २०६७.६० चौ.मी. आरक्षीत क्षेत्राचे संपादन करणेकामी नवीन भूसंपादन अधिनियम, २०१३ चे कलम १९ नुसारचे अधिसूचना दि.२८/१०/२०२४ चे महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग १ पुणे विभागीय पुरवणी मध्ये पृष्ठ क्र. ३,४ व ५ वर प्रसिध्द झालेली आहे. सदरच्या राजपत्राची प्रत सोबत जोडली आहे.

तसेच विषयांकीत प्रकरणी उक्त अधिनियमाच्या कलम २१ च्या पोटकलम १ व २ मधील तरतुदीनुसार प्रसिध्द करावयाच्या प्रकटपत्राची प्रत सोबत जोडली आहे.

सबब, उक्त अधिनियमाच्या कलम १९ ची अधिसूचना व कलम २१ (१) (२) चे प्रकटपत्र इचलकरंजी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर तत्काळ प्रसिध्द करावे.

**सोबत :-** १) कलम १९ ची अधिसूचना प्रसिध्दीकरण पत्र.
२) कलम २१ (१) (२) चे प्रकटपत्र

सहा. संचालक नगररचना,
इचलकरंजी महानगरपालिका.

**प्रकल्पाच्या कामाचे वर्णन.–** आरक्षण क्रमांक V/४५, "प्राथमिक शाळा व क्रीडांगण" यासाठी भूसंपादन करणे.

**समाजाला होणारे लाभ.–** पायाभूत सुविधा, सोयी-सुविधा.

**अनुसूची-तीन**

**पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन**

**जिल्हा कोल्हापूर, तालुका हातकणंगले, गाव मौजे शहापूर**

| अ. क्र. | भूमापन क्रमांक किंवा गट नंबर | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**अनुसूची-चार**

**(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)**

**निरंक**

टीप : उक्त जमिनींचा नकाशा भूमी संपादन विशेष अधिकारी (११), कोल्हापूर यांच्या १०९१, सी वॉर्ड, बिंदू चौक, कोल्हापूर येथील कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत निरीक्षणासाठी उपलब्ध आहे.

**अमोल येडगे,**
(भा.प्र.से.),
जिल्हाधिकारी, कोल्हापूर.

कोल्हापूर, २५ ऑक्टोबर २०२४.

---

**जिल्हा कोल्हापूर**

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम १२६, पोट-कलम (४) सह भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या कलम १९ अन्वये.*

अधिसूचना

(नमुना १-अ)

क्रमांक कार्यासन-११/भूसं/आरआर/एलएक्यू/स्पे./४८४/इचलकरंजी/१०५९/२०२४.– ज्याअर्थी, इचलकरंजी शहराच्या मूळ हद्दीच्या भागश: क्षेत्राची व वाढीव हद्दीची सुधारित विकास योजना (यापुढे "उक्त विकास योजना" म्हणून संबोधिलेली) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे "उक्त नगररचना अधिनियम" म्हणून संबोधिलेला ) चे कलम ३१ *(१)* नुसार नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्रमांक टीपीएस-२१११/१३५२/सीआर-१९/१२/डी.पी.सॅन्क्शन/यूडी-१३, दिनांक २४ मे २०१२ अन्वये मंजूर झाली असून ती दिनांक १० जुलै २०१२ पासून अंमलात आलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेत मौजे शहापूर, तालुका हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर येथील सोबतच्या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या सि.स.नं. १९४२८ पै. (गट नंबर ३८५ पै.), सि.स.नं. १९५२२ पै. (गट नंबर ३८९ पै.) व सि. स. नं. १९२५६ पै. (गट नं. ३८७ पै.) (यापुढे "उक्त जमिनी" म्हणून संबोधिलेली) या जमिनी आरक्षण क्रमांक IV/२९, "गार्डन" या सार्वजनिक प्रयोजनासाठी आरक्षित आहेत (यापुढे "उक्त सार्वजनिक प्रयोजन" म्हणून संबोधिलेले) ;

आणि ज्याअर्थी, इचलकरंजी महानगरपालिकेने नियोजन प्राधिकरण म्हणून (यापुढे "उक्त महानगरपालिका" म्हणून संबोधिलेली) उक्त नगररचना अधिनियमाचे कलम, १२६ अन्वये उक्त जमिनी उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादन करणेबाबत जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडे दिनांक २० जानेवारी २०२३ चे पत्र क्रमांक इमपा/नरवि/१२२२/प्र.क्र.०१९/१८३०/२३ अन्वये प्रस्ताव सादर केला आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास व सार्वजनिक आरोग्य विभागाकडील उक्त नगर रचना अधिनियमाच्या कलम १५१, पोटकलम *(१)* खालील अधिसूचना क्रमांक टीपीएस-२१७५/५१०६/यूडी-७, दिनांक ३ मार्च १९७९ अन्वये, मंजूर विकास योजनेत सार्वजनिक प्रयोजनासाठी विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या जमिनींच्या संपादनाबाबतच्या उक्त नगररचना अधिनियमाच्या कलम १२६, पोट-कलम *(१)*, *(२)* व *(४)* खालील राज्य शासनाने वापरावयाच्या शक्ती त्या-त्या जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आलेल्या आहेत.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाकडील अधिसूचना क्रमांक एमआयएस-११/२०१४/सीआर-७७(PART-२)/A-२, दिनांक ११ सप्टेंबर २०१५ अन्वये, भू-संपादन अधिनियम, २०१३ अंतर्गत भूसंपादनाच्या कार्यवाहीसाठी सुमारे १०,००० हे. क्षेत्राच्या मर्यादेत समुचित शासन म्हणून शासनाचे अधिकार संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत.

आणि ज्याअर्थी, उक्त नगररचना अधिनियमाच्या कलम १२५ मध्ये सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम ५ *(१)* अन्वये दाखल मजकूर व ५ *(२)* अन्वये दाखल परंतुकानुसार उक्त नगररचना अधिनियमांतर्गत विकास योजनेतील आरक्षित जमिनीचे संपादन करताना भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (यापुढे "उक्त भूसंपादन अधिनियम" म्हणून संबोधिलेला) मधील कलम ४ ते १५ (दोन्हीसह) यामध्ये विनिर्दिष्ट केलेली कार्यपद्धती, अशा जमिनींच्या संदर्भात लागू होत नाहीत, तसेच शासनाच्या नगर विकास विभागाकडील दिनांक ८ मार्च २०१९ चे पत्र क्रमांक टीपीएस/१८१९/१७९६/प्र.क्र.२९८/१८/नवि-१३ अन्वये, "उक्त नगररचना अधिनियमांतर्गत विकास योजनेतील आरक्षित जमिनींचे संपादन करताना उक्त भूसंपादन अधिनियमातील कलम ११ *(१)*, १६ ते १८ व यासोबतच परिशिष्ट २ व ३ तसेच या अनुषंगिक कलमे लागू होणार नाहीत." अशा मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत ;

आणि ज्याअर्थी, सोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या व उक्त विकास योजनेत आरक्षण क्रमांक IV/२९, "गार्डन" यासाठी आरक्षित केलेल्या जमिनींची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता असल्याबाबत समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांची खात्री झाली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनींच्या संपादनापोटी द्यावयाच्या नुकसान भरपाईची संपूर्ण रक्कम उक्त महानगरपालिकेने अदा करावयाची आहे.

त्याअर्थी, शासनाने प्रदत्त केलेल्या अधिकारांचा वापर करून आणि उक्त नगररचना अधिनियमाच्या कलम १२६, पोट-कलम *(४)* सह भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या कलम १९ अन्वये जिल्हाधिकारी, कोल्हापूर याद्वारे असे घोषित करतात की, उक्त जमिनी उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहेत.

उक्त भूसंपादन अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(छ)* अन्वये, समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, कोल्हापूर उक्त भूसंपादन अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी भूमी संपादन विशेष अधिकारी (११), कोल्हापूर यांस पदनिर्देशित करीत आहेत.

त्याचप्रमाणे उक्त जमीन उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादन करणेबाबतची कार्यवाही आवश्यक त्या सर्व व्यवस्था करून सुरू करावी व ताब्यात घ्यावी, असे निर्देश देण्यात येत आहेत.

## अनुसूची-एक

## संपादित करावयाच्या जमिनींचे वर्णन

### जिल्हा कोल्हापूर, तालुका हातकणंगले, गाव मौजे शहापूर

| अ. क्र. | भूमापन क्रमांक/ गट नंबर | अंदाजित क्षेत्र | चतु:सीमा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ (चौ.मी.) | ४ |
| १ | सि.स.नं. १९४२८ पै. (गट क्र. ३८५ पै.) | १०२२.३२ चौ. मी. | पूर्व- सि.स.नं. १९२५६<br>पश्चिम- सि.स.नं. १९४२८ पै. उर्वरित क्षेत्र<br>उत्तर- सि.स.नं. १९५२२<br>दक्षिण- सि.स.नं. १९२५७ |
| २ | सि.स.नं. १९५२२ पै. (गट क्र. ३८९ पै.) | २७८.०० चौ. मी. | पूर्व- सि.स.नं. १९२५५ पै.<br>पश्चिम- सि.स.नं. १९५२२ पै. उर्वरित क्षेत्र<br>उत्तर- सि.स.नं. १९५२२ पै. उर्वरित क्षेत्र<br>दक्षिण- सि.स.नं. १९४२८. |
| ३ | सि.स.नं. १९२५६ पै. (गट क्र. ३८७ पै.) | ७६७.२८ चौ. मी. | पूर्व- १२ मी. रुंद वि. यो. रस्ता<br>पश्चिम- सि.स.नं. १९४२८<br>उत्तर- सि.स.नं. १९२५५<br>दक्षिण- सि.स.नं. १९२५७. |

एकूण क्षेत्र .. २०६७.६० चौ. मी.

### अनुसूची-दोन

### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

**प्रकल्पाचे नाव.–** मौजे शहापूर, तालुका हातकणंगले येथील सि.स.नं. १९४२८ पै. (गट नंबर ३८५ पै.), सि.स.नं. १९५२२ पै. (गट नंबर ३८९ पै.) व सि. स. नं. १९२५६ पै. (गट नं. ३८७ पै.) जमिनी इचलकरंजी शहराच्या मूळ हद्दीच्या भागश: क्षेत्राच्या व वाढीव हद्दीच्या मंजूर सुधारित विकास योजनेतील आरक्षण क्रमांक IV/२९, "गार्डन" यासाठी भूसंपादन करणे.

**प्रकल्पाच्या कामाचे वर्णन.–** आरक्षण क्रमांक IV/२९, "गार्डन" यासाठी भूसंपादन करणे.

**समाजाला होणारे लाभ.–** पायाभूत सुविधा, सोयी-सुविधा.

### अनुसूची-तीन

### पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

### जिल्हा कोल्हापूर, तालुका हातकणंगले, गाव मौजे शहापूर

| अ. क्र. | भूमापन क्रमांक किंवा गट नंबर | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

### अनुसूची-चार

### (पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)

**निरंक**

**टीप :** उक्त जमिनींचा नकाशा भूमी संपादन विशेष अधिकारी (११), कोल्हापूर यांच्या १०९१, सी वॉर्ड, बिंदू चौक, कोल्हापूर येथील कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत निरीक्षणासाठी उपलब्ध आहे.

**अमोल येडगे,**
(भा.प्र.से.),
जिल्हाधिकारी, कोल्हापूर.

कोल्हापूर, २५ ऑक्टोबर २०२४.

---

जिल्हा कोल्हापूर

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम १२६, पोट-कलम (४) सह भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या कलम १९ अन्वये.*

### अधिसूचना

### (नमुना १-अ)

क्रमांक कार्यासन-११/भूसं/आरआर/एलएक्यू/स्पे./४८६/इचलकरंजी/१०६०/२०२४.– ज्याअर्थी, इचलकरंजी शहराच्या मूळ हद्दीच्या भागश: क्षेत्राची व वाढीव हद्दीची सुधारित विकास योजना (यापुढे "उक्त विकास योजना" म्हणून संबोधिलेली) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे "उक्त नगररचना अधिनियम" म्हणून संबोधिलेला ) चे कलम ३१ *(१)* नुसार नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्रमांक टीपीएस-२१११/१३५२/सीआर-१९/१२/डी.पी.सॅन्क्शन/यूडी-१३, दिनांक २४ मे २०१२ अन्वये मंजूर झाली असून ती दिनांक १० जुलै २०१२ पासून अंमलात आलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेत मौजे शहापूर, तालुका हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर येथील सोबतच्या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या सि.स.नं. १९४२८ पै. (गट नंबर ३८५ पै.), सि.स.नं. १९५२२ पै. (गट नंबर ३८९ पै.) व सि. स. नं. १९२२३ पै. (गट नं. ३९० पै.) (यापुढे "उक्त जमिनी" म्हणून संबोधिलेली) या जमिनी आरक्षण क्रमांक IV/३०, "क्रीडांगण" या सार्वजनिक प्रयोजनासाठी आरक्षित आहेत (यापुढे "उक्त सार्वजनिक प्रयोजन" म्हणून संबोधिलेले) ;

आणि ज्याअर्थी, इचलकरंजी महानगरपालिकेने नियोजन प्राधिकरण म्हणून (यापुढे "उक्त महानगरपालिका" म्हणून संबोधिलेली) उक्त नगररचना अधिनियमाचे कलम, १२६ अन्वये उक्त जमिनी उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादन करणेबाबत जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडे दिनांक २० जानेवारी २०२३ चे पत्र क्रमांक इमपा/नरवि/१२२२/प्र.क्र.०१८/१८२९/२३ अन्वये प्रस्ताव सादर केला आहे ;

**भूसंपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम २१ च्या पोट कलम (१) व (२) अन्वये प्रसिध्द करावयाचे प्रकटपत्र.**

यावरुन जाहिररित्या जाणीव करुन देण्यात येत आहे की, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ (४) सह भूमिसंपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ अन्वयेची मा.जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडील दि.२५/१०/२०२४ ची क्र.कार्यासन-११/भूसं/आरआर/एलएक्यू/स्पे/४८४/ इचलकरंजी/१०५९/२०२४, अन्वयेची अधिसुचना दि. २८/१०/२०२४ चे महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक-असाधारण-पुणे विभागीय पुरवणीमध्ये पृष्ठ क्र. ३,४ व ५ वर प्रसिध्द झालेली आहे.

मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्या अधिसुचनेमध्ये नमुद मौजे शहापूर गावात किंवा गावाजवळ असलेल्या जमिनींपैकी खाली दर्शविलेल्या सि.स.नं./गट क्र. मधील नुकतीच निशाणी केलेली, त्यावर असलेली झाडे झुडपे वगैरेसह खाली दर्शविल्याप्रमाणे कमी किंवा अधिक भरणारी जागा सरकारकडून लवकरच इचलकरंजी शहराच्या मुळ हद्दीच्या भागश: क्षेत्राची व वाढीव हद्दीची मंजूर सुधारित विकास योजनेतील जमिनी आरक्षण क्र. IV/२९, "गार्डन" या सार्वजनिक प्रयोजनासाठी ताब्यात घेण्यात येणार आहेत.

तरी सदरहू जमिनीत हितसंबध असलेल्या सर्व इसमांस यावरुन फर्मविण्यात येते की, त्यांनी भूमि संपादन विशेष अधिकारी (११), कोल्हापूर १०९१, सी वॉर्ड, बिंदू चौक, कोल्हापूर यांच्या कार्यालयात शुक्रवार दि.२०/१२/२०२४ रोजी दुपारी १२.३० वाजता जातीने अगर अभिकर्ता मार्फत हजर राहून सदरहु जमिनींतील आपआपल्या हितसंबधाचा प्रकार, त्यासंबंधात मिळावयाच्या मोबदल्याच्या रकमेचा तपशील व सदरहू अधिनियमाचे कलम २० अन्वये केलेल्या जागेच्या मोजणी संबंधी काही हरकती असल्यास त्याची संपूर्ण तपशीलवार माहिती दयावी, चुकू नये.

**परिशिष्ट**

**संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन**

**गावाचे नांव - मौजे शहापूर, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर**

| अनुक्रमांक | संपादनाखालील मिळकती<br>भूमापन क्र.किंवा गट नं. | संयुक्त मोजणी विवरण पत्रानुसारचे क्षेत्र चौ.मी. | भुसंपादनाखालील अंदाजित क्षेत्र (चौ.मी.) | चतु: सिमा |
|---|---|---|---|---|
| १. | सि.स.नं१९४२८पै. (गट नं. ३८५ पै.) | १०२२.३२ चौ.मी. | १०२२.३२ चौ.मी. | पूर्व- सि.स.नं.१९२५६<br>पश्चिम- सि.स.नं.१९४२८ पै उर्वरीत क्षेत्र<br>उत्तर- सि.स.नं.१९५२२<br>दक्षिण- सि.स.नं.१९२५७ |
| २. | सि.स.नं.१९५२२पै. (गट नं. ३८९ पै.) | २७८.०० चौ.मी. | २७८.०० चौ.मी. | पूर्व- सि.स.नं.१९२५५ पै<br>पश्चिम- सि.स.नं.१९५२२ पै उर्वरीत क्षेत्र<br>उत्तर- सि.स.नं.१९५२२ पै उर्वरीत क्षेत्र<br>दक्षिण- सि.स.नं. १९४२८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३. | सि.स.नं.१९२५६पै. (गट नं. ३८७ पै.) | ७६७.२८ चौ.मी. | ७६७.२८ चौ.मी. | पूर्व- १२ मी. रुंद वि.यो. रस्ता<br>पश्चिम- सि.स.नं.१९४२८<br>उत्तर- सि.स.नं.१९२५५<br>दक्षिण- सि.स.नं.१९२५७ |
| | एकूण क्षेत्र | | २०६७.६० चौ.मी. | |

**ज्यासाठी जमीन संपादन करावयाची आहे ते प्रयोजन :-**

मौजे शहापुर, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर येथील सि.स.नं १९४२८ पै. (गट नं. ३८५ पै.), सि.स नं १९५२२पै. (गट नं. ३८९ पै) व सि.स.नं १९२५६ पै.(गट नं. ३८७ पै ) या जमिनी इचलकरंजी शहराच्या मुळ हद्दीच्या भागश: क्षेत्राच्या व वाढीव हद्दीच्या मंजूर सुधारित विकास योजनेतील आरक्षण क्र IV/२९, "गार्डन" यासाठी भूसंपादन करणे.

जा.क्र. एलएक्यू/स्पे/४८४/ इचलकरंजी /भूसंविअ-११को/ ४६६
दिनांक :- ०६/११/२०२४
ठिकाण : १०९१, सी वॉर्ड, बिंदूचौक, कोल्हापूर

(गुलाबराव ह.झांबरे)
प्र. भूमी संपादन विशेष अधिकारी (११),
कोल्हापूर

भूमि संपादन विशेष अधिकारी (११) कोल्हापूर

F:\laq484\कलम 21 जाहीर प्रसिध्दीकरण 484.docx